महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. अनुदा-०११९/प्र.क्र.१६०/चार/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक १३ सप्टेंबर २०१९.

विषय :- गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ८००, इतर खर्च, (००) (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे (४०७००२११) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे, या तपशीलवर लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पित अनुदान खर्च करण्यास मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्र. ससमा-२०१०/ प्र.क्र.४८(भाग-१)/ का.१४६१, दिनांक ११.०६.२०१८.
2) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९.
3) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-अ/ अर्थसंकल्प/ वार्षिक-योजना/ २०-१९/ ७२/ २०१८, दिनांक २४.०६.२०१९.
4) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-अ/ अर्थसंकल्प/ वार्षिक-योजना/ २०-१९/ ७२/ २०१८, दिनांक १६.०७.२०१९.

ज्ञापन.

"महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१९" *(सन २०१९ चा महा. अधि. क्र.८)* हा महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार, दिनांक ०४.०७.२०१९, यामध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ८००, इतर खर्च, (००) (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे (४०७००२११) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे, या तपशीलवर लेखाशीर्षाखाली रु.४०,००,००,०००/- (रुपये चाळीस कोटी फक्त) इतकी तरतूद करण्यात आली आहे.

२. सन २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या प्रथम नऊमाहीकरिता *(डिसेंबर २०१९ च्या अखेरपर्यंत)* आवश्यक असणाऱ्या अनिवार्य खर्च व कार्यक्रमांतर्गत खर्च यांचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतुदीच्या ६० टक्के मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर वित्त विभागाकडून वितरित करण्यात आला आहे.

३. पोलीस महासंचालक, म.रा., यांनी उक्त तपशीलवार लेखाशीर्षाखाली मागील वित्तीय वर्षात (सन २०१८-१९) वितरित केलेल्या अनुदानाचे उपयोजन प्रमाणपत्र सादर केले असून चालू (२०१९-२०) वित्तीय वर्षात अर्थसंकल्पीत अनुदान वितरण करण्याची विनंती केली आहे. तसेच, उक्त तपशीलवार लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही असे त्यांनी कळविले आहे.

४. त्या अनुसार, गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ८००, इतर खर्च, (००) (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे (४०७००२११) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे, या तपशीलवर लेखाशीर्षाखाली रु.२४,००,००,०००/- (रुपये चोवीस कोटी फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास, याद्वारे, पुढील अटींवर मंजुरी देण्यात येत आहे:-

१) पोलीस महासंचालक, म.रा., यांनी कामांचे प्राथम्य ठरवून काम निहाय निधी वाटप करावा. कामांचे प्राथम्य ठरवताना प्रथम अपूर्ण कामे व त्यानंतर नवीन कामे हा अग्रक्रम लक्षात घ्यावा.

२) वित्तीय साधनसंपत्तीचा विरळ प्रसार *(Thin spreading of financial resources)* होणार नाही याची काळजी घ्यावी.

३) महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका *(शा.नि., वित्त विभाग, विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५)* यांचे अनुपालन करण्यात यावे.

४) उक्त निधीचे उपयोजन प्रमाणपत्र शासनास (गृह विभाग) सादर करणे बंधनकारक राहील.

५. उक्त रु.२४,००,००,०००/- (रुपये चोवीस कोटी फक्त) इतकी रक्कम ही अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर पोलीस महासंचालक, म.रा., यांना वितरित करण्यात आली आहे. हा निधी अहारित करुन संबंधितांना वितरण करण्यासाठी पोलीस महासंचालक, म.रा., यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. गृह (पोलीस) विभागाच्या निवासी व कार्यालयीन इमारतींची सर्व बांधकामे ही महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत करण्यात यावी आणि त्या प्रयोजनासाठी खर्चाचे अंदाज व नकाशे यांना प्रशासकीय मान्यता किंवा, यथास्थिती, सुधारित प्रशासकीय मान्यता उक्त महामंडळाकडून प्रदान करण्यात येईल, असे निदेश शासन पत्र, गृह विभाग, क्र.बैठक-१११७/ प्र.क्र.५४७/ पोल-७, दिनांक १०.०५.२०१८, द्वारे देण्यात आले आहेत. म्हणून, पोलीस महासंचालक, म.रा., यांनी उक्त निधी आहरित करुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., यांना द्यावा.

७. याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की,-

१) उक्त तपशीलवार लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९, व त्याचे परिशिष्ट यांमधील संबद्ध अटींची पूर्ती झाली आहे.

८. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१४२२४१५३२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL
GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f
2735ad885627, postalCode=400032, street=2ND
FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e
66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.09.13 14:34:16 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.

प्रत-

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
६) कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ अर्थ-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड फाईल, पोल-७.